अंत्योदय मिशन

# अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम

तह . नरखेड जि. नागपूर – ४४१३०१ ( महा.)

## ग्रंथालय विभाग

# “वाचन संकल्प महाराष्ट्राचा”

## उपक्रम अहवाल

## १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५



Scanned with OKEN Scanner

# अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा अहवाल

अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम येथे दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत **“ वाचन संकल्प महाराष्ट्राचा ”** हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या मध्ये ३० डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत महाविद्यालयातील ग्रंथालय स्वछता करण्यात आली. विद्यार्थ्यांना वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली व **“ वाचन संकल्प महाराष्ट्राचा ”** पंधरवाडा कार्यक्रम साजरा करण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली.

### “ वाचन संकल्प महाराष्ट्राचा ” या कार्यक्रमाचे उद्घाटन :

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे उद्घाटन सोहळा ०१ जानेवारी २०२५ ला विविध उपक्रमाद्वारे संपन्न झाला आहे. उद्घाटनाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. देवेंद्र भोंगाडे, प्राचार्य, अंत्योदय महाविद्यालय देवग्राम तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा. परेश देशमुख, नबीरा महाविद्यालय, काटोल व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नागेश ढोबळे ,ग्रंथालय विभागाचे प्रमुख प्रा.देवेंद्र वासाडे उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तकाचा वाचक वर्ग हा कमी झालेला आहे. प्रत्येक जण मोबाईलच्या माध्यमातून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतो त्यामध्ये व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम इ. समाज माध्यमांचा वापर करीत असल्याचे दिसत आहे त्यामुळे आपली वाचन संस्कृती ही लोप पावताना दिसून येत आहे. या वाचन संस्कृतीचे जतन करणे म्हणजेच तिला जपणे ही काळाची गरज आहे आणि म्हणून प्रत्येकाने वाचन संस्कृती ही जपायला पाहिजे असे यावेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा. परेश देशमुख यांनी सांगितले की आजच्या काळामध्ये वाचाल तर वाचाल हा विचार प्रत्येक माणसाने अंमलात आणायला पाहिजे. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे यांनी आपल्या भाषणात सांगितले की वाचन करणे हे मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे प्रत्येकाने नियमित वाचन करायला पाहिजे वाचनाने मनुष्य सुसंस्कृत होतो वाचनातूनच माणसांमध्ये चांगल्या विचारांचा परिपोष होतो असे यावेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. देवेंद्र वासाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अंकुश बोबडे यांनी केले तसेच मान्यवरांचे आभार प्रा.प्रीतम सुखदेवे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका वृंद ,शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




अध्यक्ष डॉ. देवेंद्र भोंगाडे, प्राचार्य, अंत्योदय महाविद्यालय देवग्राम मार्गदर्शन करताना

Scanned with OKEN Scanner

नवराष्ट्र
www.navarashtra.com

प्राचार्य देवेंद्र भोंगाडे • अंत्योदय महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अभियान

## माहिती तंत्रज्ञान काळात वाचन संस्कृती जपणे गरजेचे

नरखेड, तालुका प्रतिनिधी. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तकांचा वाचकवर्ग हा कमी झालेला आहे. प्रत्येक जण मोबाईलच्या माध्यमातुन माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्यामध्ये व्हाट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम इत्यादी समाज माध्यमांचा वापर करीत असल्याने आपली वाचन संस्कृती ही लोप पावताना दिसून येत आहे. या वाचन संस्कृतीचे जतन करणे म्हणजेच तिला जपणे ही काळाची गरज आहे. करीता प्रत्येकाने वाचन संस्कृती ही जपायला हवी, असे आवाहन कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी विद्यार्थ्यांना केले. देवग्राम येथील अंत्योदय महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या 'वाचन संकल्प



महाराष्ट्राचा' या उपक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

महाविद्यालयात 1 ते 15 जानेवारी 2025 दरम्यान विविध उपक्रम स्वरूपात हार्दिक पंधरवाडा राबविला जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने हा पंधरवाडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा म्हणून महाविद्यालयात साजरा केला जाईल. कार्यक्रमाचे उद्घाटक नबीरा महाविद्यालय, काटोलचे प्रा. परेश देशमुख यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी अंत्योदय महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नागेश ढोबळे, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. देवेंद्र वासाडे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रा. देशमुख यांनी आजकालात 'वाचाल तर वाचाल' हा विचार प्रत्येकाने अंमलात आणावा, असे सांगितले. उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे यांनी वाचन करणे हे मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने नियमित वाचन करावे, वाचनाने मनुष्य सुसंस्कृत होतो. वाचनातूनच माणसांमध्ये चांगल्या विचारांचा परिपोष होत असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक प्रा. देवेंद्र वासाडे, संचालन प्रा. अंकुश बोबडे यांनी केले, तर आभार प्रा. प्रीतम सुरकुंडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

Orange City Metro Edition
Jan 02, 2025 Page No. 5
Powered by: Navarashtra.com

## वाचन कौशल्य कार्यशाळा :

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत 'वाचन' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन दिनांक ०२ जानेवारी २०२५ ला सकाळी १०.०० ते ११.०० या कालावधीत डॉ. देवेंद्र भोंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंत्योदय कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नागेश ढोबळे उपस्थित होते. तसेच प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रवीण घारपुरे, मराठी विभाग प्रमुख, अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम, सहवक्ते प्रा. उमेश निस्वादे व प्रा.धनराज पांडव, ग्रंथालय विभागातील कार्यशाळेचे समन्वयक, देवेंद्र वासाडे उपस्थित होते. या कार्यशाळेत डॉ. प्रवीण घारपुरे यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत 'वाचन कौशल्य या विषयाची मांडणी करताना, 'वाचनामुळे माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन माणूस सुसंस्कृत होतो आणि त्याच्या वर्तनामध्ये परिवर्तन घडून येते. मनुष्य रानटीपणात राहत नाही असा एका लॅटिन कवींच्या विचारांचा संदर्भ देऊन प्रत्येकाने नियमित वाचन करावे असे मत व्यक्त केले. तसेच 'नाटक' या साहित्यकृतीचे वाचन कसे करावेत हे पटवून देण्यासाठी वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' या नाटकातील काही संवादांचे वाचन केले. प्रा. उमेश निस्वादे यांनी कवितेच्या परिप्रेक्ष्यातून आपले विचार अभिव्यक्त करताना कविता वाचन कसे करावे याविषयी बहुमूल्य असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. प्रा. धनराज पांडव यांनी ललित साहित्यातील कथा- कादंबरी या साहित्याचे वाचन कसे करावे यासंदर्भात प्रत्यक्ष कादंबरीचे वाचन कले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक देवेंद्र वासाडे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा. अमोल मोरे यांनी तर मान्यवरांचे आभार प्रा.अविनाश निंभोरकर यांनी मानले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका वृंद ,शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



प्रमुख वक्ते, डॉ. प्रवीण घारपुरे, मराठी विभाग प्रमुख मार्गदर्शन करतांना

Scanned with OKEN Scanner

नवराष्ट्र
www.navarashtra.com

डॉ. प्रवीण घारपुरे ● 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत कार्यशाळा

# वाचनाने मनुष्य सुसंस्कृत होतो

साहित्य



नरखेड, तालुका प्रतिनिधी. अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत 'वाचन' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. देवेंद्र भोंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन अंत्योदय कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नागेश ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण घारपुरे, प्रा. उमेश निस्वादे, प्रा. धनराज पांडव उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक देवेंद्र वासाडे होते.

डॉ. प्रवीण घारपुरे यांनी वाचनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, मनुष्य सुसंस्कृत बनतो, आणि त्याच्या वर्तनात सकारात्मक बदल होतो. त्यांनी [illegible] संदर्भ देत माणूस रानटीपणातून सुसंस्कृततेकडे वाचनाच्या माध्यमातून कसा प्रवास करतो, हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना नाट्यवाचनाची गोडी लावण्यासाठी त्यांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' मधील काही संवादांचे वाचन करून दाखवले. प्रा. उमेश निस्वादे यांनी कविता वाचनावर मार्गदर्शन करताना कुसुमाग्रज, ग्रेस, आणि बहिणाबाई यांच्या कवितांचे संदर्भ दिले. प्रा. धनराज पांडव यांनी कथा-कादंबरी वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

## जीवनात बदल घडविण्याचे आवाहन

लोकशाहीर [illegible] विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामधून विद्यार्थ्यांना जीवनात [illegible] करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवेंद्र वासाडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. [illegible] यांनी तर आभार प्रा. [illegible] यांनी मानले. अध्यक्षीय भाषणात प्रा. नागेश ढोबळे यांनी वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जीवनात आमूलाग्र बदल घडविण्याचे आवाहन केले.

Orange City Metro Edition
Jan 09, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

## विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे सामूहिक वाचन व ग्रंथ प्रदर्शनी :

महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे सामूहिक वाचन कार्यक्रम दिनांक ०३ जानेवारी ते ०९ जानेवारी २०२५ या कालावधीत घेण्यात आला. यामध्ये विविध शाखेच्या विद्यार्थ्यांना वाचन रुची निर्माण व्हावी या हेतूने अवांतर वाचन विषयाशी संबंधित भव्य ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन अंत्योदय पब्लिक स्कूल च्या प्राचार्या काझी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. सोबतच या ग्रंथ प्रदर्शनीसाठी उपस्थित महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ .राजू श्रीरामे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नागेश ढोबळे,डॉ. कल्याणी ठाकरे, डॉ. प्रवीण घारपुरे ग्रंथालय विभागाचे प्रमुख प्रा.देवेंद्र वासाडे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापिका वृंद उपस्थित होते. याप्रसंगी ग्रंथ हेच खरे गुरु असून प्रत्येक विद्यार्थ्यांनी दररोज कमीत कमी एक तास ग्रंथालयात बसून पुस्तकाचं वाचन करायला पाहिजे असे मत उद्घाटक काझी मॅडम यांनी व्यक्त केले. या ग्रंथ प्रदर्शनीला महाविद्यालयातील विविध विद्याशाखेचे सर्व विद्यार्थी व तसेच प्राध्यापक उपस्थित होते. ग्रंथालय विभागाच्या वतीने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.





Scanned with OKEN Scanner

ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन :




ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन अंत्योदय पब्लिक स्कूल च्या प्राचार्या काझी मॅडम करताना




Scanned with OKEN Scanner

नवराष्ट्र
www.navarashtra.com

वाचन पंधरवडा : 'ग्रंथ हेच खरे गुरु' विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी संदेश

# अंत्योदय महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



वरखेड, तालुका प्रतिनिधी. अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत वाचन पंधरवडा बुधवार (दि.1) ते बुधवार (दि.15) जानेवारीदरम्यान साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने महाविद्यालयात भव्य ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे यांच्या मार्गदर्शनात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन अंत्योदय पब्लिक स्कूलच्या प्राचार्या काळी यांच्या हस्ते पार पडले.
उद्घाटन प्रसंगी काळी यांनी ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, 'ग्रंथ हेच खरे गुरू आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांनी दररोज काहीतरी वेळ ग्रंथालयात व्यतीत करून पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांच्या विचारांची प्रगल्भता आणि ज्ञानात वाढ होते.' या ग्रंथ प्रदर्शनीसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नागेश ढोबळे, डॉ. कल्याणी ठाकरे, डॉ. प्रवीण चारपुरे, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. देवेंद्र वासाडे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका उपस्थित होते. प्रदर्शनीत विविध विद्याशाखांचे प्राध्यापक डॉ. मनिषा आचार्य, प्रा. अंकुश शेंबडे, प्रा. हर्षा शेंडकर, प्रा. रुपाली वाडबुधे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. ग्रंथालय विभागाच्या वतीने या भव्य प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनाविषयी गोडी निर्माण होण्यास मदत झाली. यावेळी महाविद्यालयात विविध प्रकारच्या ग्रंथांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. ज्यामध्ये साहित्य, कादंबरी, कथा, विज्ञान, आणि अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तकांचा समावेश होता.

Orange City Metro Edition
Jan 09, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

**कथा कथन :**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या अंतर्गत कथा कथन कार्यक्रम दिनांक १० जानेवारी २०२५ ला **"युवावस्था आणि पुस्तके"** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.नागेश ढोबळे, उपप्राचार्य जीवन विकास कनिष्ठ महाविद्यालय, देवग्राम, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. देवेंद्र वासाडे, प्रा. अमोल मोरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रमुख वक्ते श्री मदन ढोले यांनी युवा अवस्था आणि पुस्तक या विषयावर आपल्या विचारांची मांडणी केली. त्यांनी सांगितले की वाचन केवळ ज्ञान वाढवण्याचे साधन नाही तर ते मानसिक आणि भावनिक विकासासाठी ही अत्यंत उपयुक्त आहे आजच्या युवा पिढीसाठी वाचन एक आवश्यक गोष्ट आहे असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्रा. नागेश ढोबळे यांनी सांगितले की युवा अवस्था हा काळ वादळी अशांततेची अवस्था असते या काळामध्ये विद्यार्थ्यांनी सुसंस्कार करणाऱ्या पुस्तकांचं वाचन करायला पाहिजे या वाचनामुळे मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा अंतर्बाह्य विकास होतो सोबतच मनुष्याची वाणीही सुसंस्कारित होते. या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापिका तसेच विद्यार्थी उपस्थित होते.





प्रमुख वक्ते, श्री मदन ढोले, शिक्षक, जीवन विकास विद्यालय, देवग्राम मार्गदर्शन करतांना

Scanned with OKEN Scanner

## विद्यार्थ्यांनी निवड केलेल्या मराठी साहित्याची आशय आणि अभिव्यक्ती

अंत्योदय महाविद्यालय देवग्राम येथे दिनांक 15 जानेवारी 2025 रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत प्राचार्य डॉ.देवेंद्र भोंगाडे यांच्या मार्गदर्शनात मराठी साहित्य आशय आणि अभिव्यक्ती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मंगेश आचार्य, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. प्रवीण घारपुरे, मराठी विभाग प्रमुख ,ग्रंथालय विभागातील प्रा. देवेंद्र वासाडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ.मंगेश आचार्य यांनी आपल्या व्याख्यानातून मराठी ऐतिहासिक साहित्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर लेखन करण्यात आलेल्या विविध साहित्य प्रकारांच्या आशय आणि अभिव्यक्ती विषयी विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजू श्रीरामे यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये साहित्य संकल्पना, साहित्याचे विविध प्रकार त्यामध्ये प्रामुख्याने नाटकांचा आशय आणि अभिव्यक्ती याविषयी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रवीण घारपुरे यांनी केले त्यांनी मराठी साहित्यातील कविता, कथा, कादंबरी यांच्या आशय आणि अभिव्यक्ती मध्ये कालपरत्वे होत गेलेले परिवर्तन याविषयी विवेचन आपल्या प्रास्ताविकातून केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमोल मोरे यांनी तर मान्यवरांचे आभार प्रा. देवेंद्र वासाडे यांनी मानले. या व्याख्यानाला महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका व्याख्यानाला उपस्थित होते.




वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात एम ए मराठी च्या विद्यार्थ्यांनी मराठी साहित्य: आशय व अभिव्यक्ती या विषयावर आपले मत व्यक्त करतांना

Scanned with OKEN Scanner

## लेखक वाचक परिसंवाद :

अंत्योदय महाविद्यालय देवग्राम येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत लेखक वाचक परिसंवादाचे आयोजन दिनांक १६ जानेवारी २०२५ ला करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंत्योदय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.देवेंद्र भोंगाडे हे होते. या कार्यक्रमात लेखक म्हणुन उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे तथा पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.योगेश सरोदे, मराठी विभाग प्रमुख डॉ.प्रवीण घारपुरे व तसेच राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मंगेश आचार्य व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी प्रा. अविनाश निंबूरकर यांनी सर्व लेखक मंडळीना त्यांचा लेखन कार्य, लेखनाच्या प्रेरणा व काव्य प्रेरणेबाबत अनेक प्रश्न विचारून बोलते केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.देवेंद्र भोंगाडे यांनी वाचन आणि लेखन कौशल्य ही एकमेकांवर अवलंबून असतात. आपण नियमितपणे जर वाचन केले तर आपल्या बुद्धीला वैचारिक खाद्य पुरवल्या जाते. आपले विचार सशक्त करण्यासाठी पुस्तकाचे वाचन करायला पाहिजे. असे मनोगत यावेळी त्यांनी व्यक्त केले. डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावरील चार पुस्तकांचे लेखन केलेले आहे. अंत्योदय महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे यांनी अर्थशास्त्र या विषयावरील एकवीस पुस्तकांचे लेखन केलेले असून मराठीतील अनेक भावाकविता आणि मराठी गझल व 3 नाटकाचे लेखन सुद्धा केलेले आहेत. डॉ. प्रवीण घारपुरे यांनी मराठी या विषयावरील दोन पुस्तकांचे लेखन केलेले आहे राज्यशास्त्र या विषयावर तर डॉ.मंगेश आचार्य यांनी तीन पुस्तके लिहिलेली आहेत डॉ.योगेश सरोदे यांनी इंग्रजी या विषयात पाच पुस्तकांचे लेखन केले आहेत




नवराष्ट्र
www.navarashtra.com

### देवग्राम येथे लेखक वाचक परिसंवाद

नरखेड, तालुका प्रतिनिधी. अंत्योदय महाविद्यालय देवग्राम येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत लेखक वाचक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे होते. कार्यक्रमात लेखक म्हणून उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे, डॉ. योगेश सरोदे, डॉ. प्रवीण घारपुरे आणि डॉ. मंगेश आचार्य उपस्थित होते. प्रा. अविनाश निंबुरकर यांनी लेखक मंडळींना लेखन प्रेरणा आणि काव्याविषयक प्रश्न विचारले. अध्यक्षीय भाषणात डॉ. भोंगाडे यांनी वाचन आणि लेखन कौशल्याबद्दल आपले विचार मांडले. महाविद्यालयातील विविध विषयांवरील साहित्यिक योगदान दिलेल्या या लेखकांनी पुस्तकांची सादरीकरणे केली. प्रास्ताविक देवेंद्र बासाडे यांनी संचालन प्रा. अविनाश निंबुरकर तर आभार प्रा. अमोल मोरे यांनी केले.



Orange City Metro Edition
Jan 22, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

Scanned with OKEN Scanner

अशाप्रकारे १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा कार्यक्रम महाविद्यालयात अतिशय उत्साहाने राबविण्यात आला. त्यामध्ये जवळपास ३०० ते ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच ४० विद्यार्थ्यांनी त्यांनी निवड केलेल्या पुस्तकावर Book Review दिले आणि ५६ विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत भाग घेतला व त्यातून सर्वोत्तम ०५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली . Book Review स्पर्धेतून सुद्धा सर्वोत्तम ०५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली व त्यांना २६ जानेवारी २०२५ ला प्रजासत्ताक दिनी बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा कार्यक्रम सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आम्ही कमीतकमी ०२ अवांतर पुस्तके प्रत्येक महिन्यात वाचन करू असा संकल्पाच केला.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | स्पर्धेचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|---|
| १ | कु. निवेदिता रवींद्र तायवाडे | बुक रिव्हीव | प्रथम |
| २ | कु युक्ता संदीप पालीवाल | बुक रिव्हीव | द्वितीय |
| ३ | कु चेतन गजानन कन्हेरे | बुक रिव्हीव | तृतीय |
| | | | |
| १. | कु गोपिका सुरेंद्र इंगोले | निबंध स्पर्धा | प्रथम |
| २ | कु. आलीय निसार शेख | निबंध स्पर्धा | द्वितीय |
| ३ | कु सुमाजीया जिगर शेख | निबंध स्पर्धा | तृतीय |

Antyoday Mission

**ANTYODAY MAHAVIDYALAYA, DEVGRAM**

Tah. Narkhed, Dist. Nagpur-441301 (MS)

**" VACHAN SANKALP MAHARASHTRACHA"**

*Certificate*

This is to certify that, Mr/Miss/Mrs : *Yukta Sandip Paliwal*

Participated in " Vachan Sankalp Maharashtracha" on Initiative of Department of Higher Education From 01/01/2025 To 15/01/2025. During this initiative, He/She participated in Book Review/Essay Competition and common reading

He/She bagged **Second** Prize in **Book Review**

Co-ordinator
Mr. Devendra Wasade

Principal
Dr. Devendra Bhongade

Librarian
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

Principal
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner

Antyoday Mission

# ANTYODAY MAHAVIDYALAYA, DEVGRAM

Tah. Narkhed, Dist. Nagpur-441301 (MS)

## " VACHAN SANKALP MAHARASHTRACHA"

## Certificate

This is to certify that, Mr/Miss/Mrs : *Gopika Surendra Ingole*

Participated in " Vachan Sankalp Maharashtracha" on Initiative of Department of Higher Education From 01/01/2025 To 15/01/2025. During this initiative, He/She participated in Book Review/Essay Competition and common reading

He/She bagged **First Prize in Essay Writing**

Co-ordinator
Mr. Devendra Wasade

Principal
Dr. Devendra Bhongade

Antyoday Mission

# ANTYODAY MAHAVIDYALAYA, DEVGRAM

Tah. Narkhed, Dist. Nagpur-441301 (MS)

## " VACHAN SANKALP MAHARASHTRACHA"

## Certificate

This is to certify that, Mr/Miss/Mrs : *Nivedita Ravindra Taywade*

Participated in " Vachan Sankalp Maharashtracha" on Initiative of Department of Higher Education From 01/01/2025 To 15/01/2025. During this initiative, He/She participated in Book Review/Essay Competition and common reading

He/She bagged **First Prize in Book Review**

Co-ordinator
Mr. Devendra Wasade

Principal
Dr. Devendra Bhongade

Librarian
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

Principal
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner

अंत्योदय मिशन

# अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम

तह. नरखेड जि. नागपूर

## ग्रंथालय विभाग

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा

महाविद्यालयीन समिती

| अ.क्र | पदाधिकाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. देवेंद्र एस. भोंगाडे | प्राचार्य |
| २ | डॉ. राजू जी. श्रीरामे | उपप्राचार्य |
| ३ | डॉ. प्रवीण एम. घारपुरे | सदस्य |
| ४ | डॉ. मंगेश जी. आचार्य | सदस्य |
| ५ | डॉ. योगेश सरोदे | सदस्य |
| ६ | डॉ. कल्याणी ए. ठाकरे | सदस्या |
| ७ | डॉ. प्रणाली एन. इंगोले | सदस्या |
| ८ | प्रा. नागेश एस. ढोबाळे | सदस्य |
| ९ | डॉ. शीतल बरांगे | सदस्या |
| १० | श्री देवेंद्र एच. वासाडे | प्रभारी ग्रंथपाल |
| ११ | कु. खुशाली एस. चरपे | विद्यार्थिनी प्रतिनिधी |

Librarian
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

Principal
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा- २०२५

## कार्यक्रमाचे नियोजन व रूपरेषा

| अ.क्र | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाचे संयोजक |
|---|---|---|---|
| १ | ३० ते ३१ डिसेंबर २०२४ | ग्रंथालय स्वच्छता, विद्यार्थ्यांना वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाची माहिती देणे, समिती स्थापन करणे | ग्रंथालय विभाग |
| २ | ०१ जानेवारी २०२५ | वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे उद्घाटन | ग्रंथालय विभाग |
| ३ | ०२ जानेवारी २०२५ | वाचन कौशल्य कार्यशाळा<br>सकाळी १०.०० ते ११.००<br>प्रमुख मार्गदर्शक १. डॉ. प्रवीण घारपुरे<br>२. प्रा. उमेश निस्वादे<br>३. प्रा. धनराज पांडव | प्रा अमोल मोरे |
| ४ | ०३ ते ०४ जानेवारी २०२५ | विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे सामुहिक वाचन महाविद्यालयीन सर्व विद्यार्थी तथा सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी | डॉ. प्रणाली इंगोले |
| ५ | ०६ ते ०७ जानेवारी २०२५ | ग्रंथ प्रदर्शनी | ग्रंथालय विभाग |
| ६ | ०८ ते ०९ जानेवारी २०२५ | सामुहिक पुस्तक वाचन व ग्रंथ कथन स्पर्धा<br>सर्व बी. एड. कॉलेज विद्यार्थी | प्रा. अविश सातपुते |
| ७ | १० जानेवारी २०२५ | कथा कथन<br>श्री मदन ढोले, अंत्योदय विद्यालय देव ग्रा म | प्रा. नरेंद्र नासरे |
| ८ | ११ जानेवारी २०२५ | निवड केलेल्या वाचन साहित्यावर निबंध स्पर्धा | प्रा. धनराज पांडव |
| ९ | १३ ते १४ जानेवारी २०२५ | विद्यार्थ्यांनी निवड केलेल्या वाचन साहित्यावर कथन स्पर्धा | प्रा.अविनाश निंबूरकर |
| १० | १५ जानेवारी २०२५ | विद्यार्थ्यांनी निवड केलेल्या मराठी साहित्याची आशय अभिव्यक्ती | प्रा अमोल मोरे |
| ११ | १६ जानेवारी २०२५ | लेखक वाचक परिसंवाद<br>डॉ. राजू श्रीरामे, डॉ. मंगेश आचार्य. डॉ. प्रवीण घारपुरे , डॉ. योगेश सरोदे | प्रा. अंकुश बोबडे |
| १२ | १७ ते २० जानेवारी २०२५ | पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा मुल्यांकन | परीक्षण समिती<br>डॉ. राजू श्रीरामे , डॉ. कल्याणी ठाकरे |
| १३ | २६ जानेवारी २०२५ | पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धेत आलेल्या प्रथम ०३ विद्यार्थांना बक्षीस व प्रमाणपत्र वितरण | प्रा. नागेश ढोबळे , रुपेश शेकार |

स्कूल कनेक्ट व वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम
आयोजक
प्राचार्य , डॉ. देवेंद्र एस. भोंगाडे

Librarian
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

Principal
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner

# Certificate Distribution of Vachan Sankalp Maharashtracha on the occasion of Republic Day





















**Librarian**
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

**Principal**
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner


# वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाची क्षणचित्रे


















**Librarian**
**Antyoday Mahavidyalaya, Devgram**
**Tah. Narkhed, Dist. Nagpur**

**Principal**
**Antyoday Mahavidyalaya**
**Devgram ,Tah. Narkhed,**
**Dist. Nagpur.**


Scanned with OKEN Scanner












Librarian
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur


Principal
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner











Librarian
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

Principal
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner














**Librarian**
Antyoday Mahavidyalaya, Devgram
Tah. Narkhed, Dist. Nagpur

**Principal**
Antyoday Mahavidyalaya
Devgram ,Tah. Narkhed,
Dist. Nagpur.

Scanned with OKEN Scanner